डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

# प्रेस नोट

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी) पुणे मार्फत अनुसूचित जातीतील एम.फिल व पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन २०१३ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृती (BANRF) हि योजना सुरु करण्यात आली आहे. BANRF-२०१८ साठी मा. नियामक मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार १०५ विद्यार्थ्यांची निवड करणेकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक १७/०३/२०२० रोजीचे पत्र व सोबत मा.मंत्री महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांच्या टिपणी क्र. E-४३२१७४० नुसार विशेष बाब अंतर्गत BANRF-१८ करिता एकूण सर्व ४०८ पात्र विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यात आलेला आहे. तसेच BANRF-१९ व BANRF-२० करिता विद्यार्थ्याची निवड करणेकरिता लेखी परीक्षा दिनांक १९ डिसेंबर २०२१ रोजी झालेली असून दिनांक ४ ते ६ जानेवारी २०२२ रोजी मुलाखती आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

सद्यस्थितीत BANRF-२०१८ एम.फिल च्या १९४ विद्यार्थ्यांना देण्यात येणारी BANRF-२०१८ हि फेलोशिप पी.एच.डी पर्यंत नियमित “विशेष बाब” म्हणून फेलोशिप मंजूर करावी अशा प्रकारची मागणीकरीता विद्यार्थी दिनांक २३ डिसेंबर २०२१ पासून मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या गावी उपोषणास बसलेली आहेत.

**सदर प्रश्न सनदशीर मार्गाने सोडविण्याकरिता बार्टी मार्फत विद्यार्थांना चर्चेकरिता आमंत्रित करण्यात आले आहे.**